महाराष्ट्र शासन
नगरविकास विभाग
**नगर परिषद प्रशासन संचालनालय**
सातवा मजला, बेलापुर भवन, सेक्टर ११, सी बी डी बेलापुर, नवी मुंबई - ४०० ६१४
desk7.dma@maharashtra.gov.in (०२२) २७५६०१४५ www.mahadma.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत लोकसेवांची सनद प्रसिद्ध करणे**

परिपत्रक क्र. क्र. नपप्रसं/का-०८/DUTD/RTS/२०२३/५६६२
दिनांक: १७/१०/२०२३

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियिम, २०१५ अंतर्गत शासनाचे आदेशानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध लोकसेवा अधिसूचित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. नागरीकांना सदर लोकसेवा प्राप्त करुन घेणे अथवा आवश्यकता असल्यास त्याबाबत अपिल करणे सुलभ व्हावे, याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी अधिसूचित केलेल्या लोकसेवांची नावे, सेवांची विहित कालमर्यादा, विहित सेवाशुल्क, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच द्वितीय अपिलीय अधिकारी यांची नावे व संपर्क क्रमांक तसेच तृतीय अपिल करीता संबंधित महसुली विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त यांचे संपर्काची माहिती इत्यादी नागरीकांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

३. त्याअनुषंगाने सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सर्व लोकसेवांची माहिती ही सोबत दिलेल्या नमुना सूचना फलकाप्रमाणे बनवुन अशी नागरीकांची सनद ही आपले नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे दर्शनीय भाग, सर्व प्रभाग क्षेत्र कार्यालय, नागरी सुविधा केंद्र तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे संकेतस्थळावर व इतर तत्सम ठिकाणी प्रसिद्ध करावी.

सोबत - नमुना सूचना फलक

(मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांचे मान्यतेने)

SHANKAR BABAN GORE
Digitally signed by SHANKAR BABAN GORE
Date: 2023.10.17 15:20:57 +05'30'

(शंकर गोरे)
उप आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१. मा. मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
२. मा. राज्य सेवा हक्क आयुक्त, सर्व महसुली विभाग.
३. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग-२, मंत्रालय, मुंबई.
४. मा. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
५. विभागीय सह आयुक्त व जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन (सर्व).
६. मुख्याधिकारी, नगरपरिषद व नगरपंचायत (सर्व).
७. निवडनस्ती.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सूचना फलक

(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५)

आपली सेवा आमचे कर्तव्य

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतूदींनूसार अधिसूचित केलेल्या सेवांबाबत तपशिल

कार्यालयाचे नाव :- विभाग:-

| अ.क्र. | अधिसूचित लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

---

तृतीय व अंतिम अपिल राज्य आयुक्त, कोकण/ पुणे/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती/ नागपूर यांचेकडे करता येईल.

त्यांचा ई-मेल ______________________________ दुरध्वनी ______________________

कार्यालय प्रमुख